दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...




पान ४ वर

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | गुरुवार, दि. २९ जानेवारी, २०२६ | वर्ष - १ | अंक - १२६ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे विमान अपघातात निधन

# लढवय्या, उमदा नेता काळाच्या पडद्याआड

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** महाराष्ट्राच्या राजकारणातील एक लढवय्या, शिस्तप्रिय आणि प्रभावी नेतृत्व आज अचानक काळाच्या पडद्याआड गेले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आज सकाळी विमान अपघातात निधन झाले आणि अवघा महाराष्ट्र शोकसागरात बुडाला आहे. ही बातमी क्षणभर तरी खोटी ठरावी, अशीच भावना सर्वसामान्यांपासून राजकीय वर्तुळापर्यंत व्यक्त होत आहे. मात्र, या कटू वास्तवाला सामोरे जाण्याशिवाय राज्यापुढे कोणताही पर्याय उरलेला नाही.

अजित पवार आज सकाळी मुंबईहून बारामतीकडे रवाना झाले होते. बारामती विमानतळावर लँडिंग होण्यापूर्वी सुमारे तीन किलोमीटर अंतरावर माळरानावर विमान कोसळले. अपघातानंतर विमानाला भीषण आग लागली. या दुर्घटनेत अजित पवार यांच्यासह विमानातील पाचही जणांचा मृत्यू झाला. या घटनेने केवळ राजकीय नव्हे, तर सामाजिक पातळीवरही मोठा धक्का बसला आहे.

निधनाचे वृत्त समजताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात शोककळा पसरली. पक्षाचे ज्येष्ठ नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते अश्रूंनी गहिवरले. अपघाताच्या वेळी युगेंद्र पवार वगळता पवार कुटुंबातील इतर सदस्य दिल्लीत होते. घटनेची माहिती मिळताच कुटुंबातील सर्व सदस्य बारामतीत दाखल झाले. खासदार सुप्रिया सुळे यांनी 'सगळं उद्ध्वस्त झालं' असा भावनिक आशय व्यक्त करणारे व्हॉट्सअॅप स्टेटस ठेवले. तर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी घटनास्थळी जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

अपघातानंतर अजित पवार यांचे पार्थिव बारामती शासकीय रुग्णालयात आणण्यात आले. रुग्णालयाबाहेर हजारो कार्यकर्त्यांची गर्दी उसळली. राज्याच्या विविध भागांतून कार्यकर्ते, नेते आणि नागरिक मोठ्या संख्येने बारामतीकडे दाखल होत आहेत. अजित पवार यांच्या अंत्यदर्शनासाठी अभूतपूर्व जनसागर लोटलेला पाहायला मिळत आहे.

कार्यकर्त्यांमधील त्यांची लोकप्रियता आणि भावनिक नाळ लक्षात घेता, अजित पवार यांचे पार्थिव विद्या प्रतिष्ठानच्या मैदानावर अंत्यदर्शनासाठी ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबत विद्या प्रतिष्ठानचे ट्रस्टी किरण गुजर यांनी माहिती दिली. त्यानुसार, आज दुपारी चार वाजल्यापासून रात्री उशिरापर्यंत विद्या प्रतिष्ठान विद्यानगरी चौकातील मैदानावर नागरिकांना अंत्यदर्शनासाठी पार्थिव ठेवण्यात येणार आहे. तसेच, उद्या सकाळी नऊ वाजता गदिमा सभागृहापासून अजित पवार यांच्या पार्थिवाची अंत्ययात्रा निघणार आहे. ही अंत्ययात्रा विद्यानगरी चौक, बिघून रोड सेवा रस्ता, विद्या प्रतिष्ठानचा रस्ता मार्गे मराठी शाळेच्या गेटने विद्या प्रतिष्ठानच्या मैदानात पोहोचेल. सकाळी ११ वाजता प्रतिष्ठानच्या मैदानावर अंत्यसंस्कार केले जाणार असल्याची माहितीही किरण गुजर यांनी दिली आहे.

# भीषण अपघातात ६ जणांचा मृत्यू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती :** महाराष्ट्राला हादरवणारी अत्यंत दुःखद घटना आज सकाळी बारामती येथे घडली. मुंबईहून बारामतीकडे येणारे लिअरजेट ४५ प्रकारचे खासगी विमान उतरण्याच्या प्रयत्नात अपघातग्रस्त झाले. या भीषण विमान अपघातात राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह पाच जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला.

अजित पवार यांच्या पार्थिवावर गुरुवारी पुणे जिल्ह्यातील बारामती येथे पूर्ण शासकीय इतमामात अंत्यसंस्कार केले जातील.

विद्या प्रतिष्ठान मैदानावर सकाळी ११ वाजता होणाऱ्या अंत्यसंस्काराला पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा उपस्थित राहण्याची अपेक्षा आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सांगितले की, राजकीय क्षेत्रातील



सर्व स्तरातील नेते उपस्थित राहतील. पवार यांच्या पश्चात पत्नी राज्यसभेच्या सदस्या सुनेत्रा आणि दोन मुले पार्थ आणि जय असा परिवार आहे. राज्य सरकारने बुधवारी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आणि तीन दिवसांचा राजकीय शोक जाहीर केला.

नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, हे विमान व्हीएसआर व्हेंचर्स प्रा. लि. या नॉन-शेड्युल्ड ऑपरेटरचे होते. विमानात दोन वैमानिकांसह एकूण पाच जण प्रवास करत होते. अपघातात विमानातील सर्व प्रवाशांना प्राणघातक दुखापती झाल्या.

बारामती हे अनियंत्रित विमानतळ असून सकाळी ८.१८ वाजता विमानाचा पहिला संपर्क झाला. धावपट्टी ११ वर उतरण्याच्या पहिल्या प्रयत्नात रनवे दिसत नसल्याने वैमानिकांनी 'गो-अराउंड' घेतला. दुसऱ्या प्रयत्नात रनवे दिसल्याचे कळवण्यात आले आणि लँडिंगसाठी परवानगी देण्यात आली. मात्र, काही क्षणांतच धावपट्टीच्या टोकाजवळ विमानाला आग लागली आणि ते धावपट्टीच्या डाव्या बाजूला कोसळले.

अपघाताची माहिती मिळताच आपत्कालीन सेवा घटनास्थळी दाखल झाल्या. मात्र, आगीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले होते. या विमान दुर्घटनेची चौकशी विमान अपघात तपास यंत्रणेकडे सोपवण्यात आली असून सखोल तपास सुरू आहे.

# अजितपर्व हरपले...!
## आ. महेश लांडगेंची श्रद्धांजली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या दुर्दैवी निधनानंतर राजकीय स्पर्धा आणि मतभेद बाजूला ठेवले गेले असून, भाजपचे आमदार महेश लांडगे यांनी अजित पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली आहे. "अजितपर्व हरपले...!" अशी भावनिक प्रतिक्रिया त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म 'एक्स' वर शेअर केली आहे.

आमदार महेश लांडगे आणि अजित पवार यांच्यात गेल्या काही काळात राजकीय स्पर्धा आणि जबरदस्त मुकाबला पहायला मिळत होता, विशेषतः पिंपरी-चिंचवड आणि महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर. मात्र आज अजित पवार यांच्या अपघाती निधनाने ही कटुता मागे पडल्याचे त्यांच्या पोस्टवरून



स्पष्ट होत आहे.

लांडगे यांच्या पोस्टमधून असा संदेशही जातो की, राजकीय मतभेद कितीही असले तरी, जो व्यक्ती एका युगाचे प्रतिनिधित्व करतो तो गमावल्यावर त्याची प्रतिष्ठा आणि कार्याच्या प्रेरणेचा आदर करणे सर्वांसाठी महत्त्वाचे असते. "एक युग संपलं," असे म्हणत लांडगे यांनी त्यांच्या श्रद्धांजलीत व्यक्त केलेले भावना हृदयस्पर्शी ठरत आहेत.

## विमान अपघाताची चौकशी होणार

**नवी दिल्ली :** बारामती विमानतळावर बुधवारी झालेल्या विमान अपघातात महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि इतर चार जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या अपघाताची चौकशी विमान अपघात तपास ब्युरो (एएआयबी) करणार आहे.

दिल्लीस्थित व्हीएसआर व्हेंचर्सच्या मालकीतील लियरजेट ४६ विमान क्रॅश-लँडिंगच्या वेळी अपघातग्रस्त झाले. विमानात क्रू मेंबर्ससह पाच जण होते, असे विमान वाहतूक नियामक डीजीसीएने सांगितले. एएआयबी अपघातस्थळाला भेट देऊन संपूर्ण चौकशी करेल.

भारतीय हवाई क्षेत्रात होणाऱ्या सुरक्षिततेच्या घटनांना अपघात, गंभीर घटना किंवा घटना अशा प्रकारे वर्गीकृत करण्याची जबाबदारी एएआयबीकडे आहे.

### बारामतीत शोकाकूल वातावरण; कार्यकर्त्यांना भावना अनावर

# दादांच्या निधनाचा पवार कुटुंबियांना धक्का

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं आज सकाळी ८ वाजून ४६ मिनिटांनी झालेल्या विमान अपघातात निधन झालं. अजित पवार यांच्या विमानाचा अपघात झाला तेव्हा खासदार सुप्रिया सुळे, खासदार सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार दिल्लीत होते. अजित पवारांच्या विमान अपघाताची माहिती मिळताच सुप्रिया सुळे, सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार विमानानं पुण्यात दाखल आले. तिथून हेलिकॉप्टरनं हे सर्वजण बारामतीत दाखल झाले. बारामतीत दाखल झाल्यानंतर सुप्रिया सुळे या भावनिक झाल्याचं पाहायला मिळालं. बारामतीत विठ्ठलदादा



मणियार यांना पाहताच सुप्रिया सुळे त्यांच्या गळ्यात पडून रडल्या.

अजितदादा पवार यांच्या मृत्यूच्या बातमीने अनेकांना धक्का बसला. राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना भावना अनावर झाल्या आहेत. अनेक नेत्यांच्या तोंडून शब्दही फुटेनासे झाले आहेत. अनेकांना अश्रू अनावर झाले आहेत. बारामतीमधील वातावरण शोकाकूल झाले आहे. अनेकांसाठी हा जबरी धक्का आहे. पवार कुटुंबियांना आणि बारामतीकरांना पोरकं झाल्यासारखं वाटत आहे. दरम्यान लाडक्या दादाचं विमान अपघातात मृत्यू झाल्याची वार्ता कळताच खासदार सुप्रिया सुळे यांना मोठा धक्का बसला आहे.

अजितदादांच्या निधनाची बातमी समजल्यानंतर पत्नी सुनेत्रा पवार, जय पवार आणि खासदार सुप्रिया सुळे दिल्लीहून बारामतीत दाखल झाले. विमानतळावर पोहोचल्यावर सुनेत्रा पवार, सुप्रिया सुळे यांना अश्रू अनावर झाले. विमानतळावर दाखल झाल्यानंतर त्या ठिकाणी शरद पवार यांचे जुने सहकारी मित्र विठ्ठल शेठ मणियार उभे होते त्यांना पाहून सुळे आणि पवार यांना अश्रू अनावर झाले. विठ्ठल शेठ मणियार हे अजित पवारांच्या अतिशय जवळचे आहेत. अजित पवार लहान असल्यापासून मणियार यांचे ते लाडके होते. सुप्रिया सुळेंनी लाडका होता तो... काय झालं असं म्हणत टाहो फोडला. सुनेत्रा पवार आणि पार्थ पवार यांनाही अश्रू अनावर झाले. पवार कुटुंबांना पाहून यावेळी उपस्थितीत लोकांच्याही डोळ्यात पाणी आलं.

दरम्यान यावेळेस विमानतळावर राणा जगजित सिंह पाटील नेण्यासाठी आले होते. यावेळी जयंत पाटील, दादा भुसे होते. विमानतळातून बाहेर पडल्यानंतर पार्थ पवार आणि सुनेत्रा पवार बारामती हॉस्पिटलमध्ये दाखल झाले. यावेळी पार्थ पवार आणि सुनेत्रा पवार यांना पाहताच कार्यकर्त्यांनी 'अजितदादा अमर रहे'च्या घोषणा दिल्या. त्याआधी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार मुंबईतून बारामतीत हेलिकॉप्टरने दाखल झाले होते.

# पायलटला होता १६ हजार तासांचा अनुभव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** अवघ्या महाराष्ट्राला हादरवून टाकणाऱ्या विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विमानातील सर्व प्रवाशांचा मृत्यू झाला. बारामती विमानतळावर लँडिंग करताना विमानाने हवेत गिरट्या घेतल्या आणि क्षणार्धात खाली कोसळले. विमान कोसळताच शेतात मोठा स्फोट झाला, ज्यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार, पायलट कॅप्टन सुमित कपूर, सह-पायलट शांभवी पाठक यांच्यासह पाच जणांचा आगीत होरपळून मृत्यू झाला.

विशेष म्हणजे, पायलट कॅप्टन सुमित कपूर यांना विमान प्रवासाचा १६,००० तासांचा अनुभव होता, तर सह-पायलट शांभवी पाठक यांना १५०० तासांचा अनुभव होता.



दोघांनाही वैमानिक म्हणून चांगला अनुभव होता, तरीही काळाचा कठीण दिवस अवघ्या महाराष्ट्राच्या नशिबी आला. कॅप्टन सुमित कपूर हे अजित पवारांच्या विमानाचे मुख्य पायलट होते, तर शांभवी पाठक ही सह-पायलट होती. शांभवी यांनी २०२० ते २०२२ दरम्यान मुंबई विद्यापीठातून एरोनॉटिक्स, एव्हिएशन, एयरोस्पेस सायन्स आणि टेक्नोलॉजी मध्ये बीएससी पदवी घेतली. यापूर्वी, २०१८-२०१९ मध्ये त्यांनी न्यूझीलंड इंटरनॅशनल कमर्शियल पायलट अकॅडमीतून एक वर्षाचा सर्टिफिकेट कोर्स पूर्ण केला होता.

२०२२ पासून शांभवी व्हीएसआर व्हेंचर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत फर्स्ट ऑफिसर पदावर कार्यरत होत्या. त्या वैमानिक आणि पायलट म्हणून या कंपनीच्या माध्यमातून सेवा देत होत्या. त्यांना मार्च २०२२ मध्ये एव्हिएशन सेक्युरिटी परवाना मिळाला होता, तर फेब्रुवारी २०२२ मध्ये जेट ओरिएंटेशन ट्रेनिंगद्वारे ए-३२० विमानाचे प्रशिक्षण प्रमाणपत्र मिळाले.

कॅप्टन सुमित कपूर यांनी सहारा जे एअरवेज आणि जेट लाईट्स कंपनीत काम केले होते. त्यांच्या अनुभवाचा आणि शांभवीच्या प्रशिक्षणाचा विचार करता, दोघांनाही व्यावसायिक प्रवासाचा चांगला अनुभव होता. हा अपघात महाराष्ट्राला धक्का देणारा ठरला असून, चार्टर्ड बिझनेस जेट प्रवासाच्या सुरक्षिततेबाबत नवे प्रश्न उपस्थित करत आहे.

विमान अपघात तपास ब्युरो (एएआयबी) या प्रकरणाची तांत्रिक चौकशी करेल, ज्यात फ्लाइट डेटा रेकॉर्डर आणि कॉकपिट व्हॉइस रेकॉर्डर यांचा सविस्तर अभ्यास करून अपघाताचे नेमके कारण समजण्याचा प्रयत्न केला जाईल.

## शहरासह जिल्ह्यात तीव्र शोककळा

**पुणे :** उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याचे सुपुत्र अजित पवार यांच्या निधनाचे वृत्त समजताच संपूर्ण महाराष्ट्र सुन्न झाला आहे. बारामती विमानतळावर झालेल्या भीषण विमान अपघातात दादांच्या निधनाची पुष्टी झाल्यानंतर, पुणे शहर आणि जिल्ह्यात तीव्र शोककळा पसरली आहे. या दुःखद घटनेच्या पार्श्वभूमीवर, महानगरपालिका आयुक्तांनी पुणे शहर आज आणि उद्या असे सलग दोन दिवस बंद ठेवण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. महानगरपालिका प्रशासनाने जाहीर केल्यानुसार, अजितदादांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शहरातील सर्व अत्यावश्यक सेवा वगळता इतर सर्व आस्थापना बंद राहतील.

# तीन प्रभावी नेत्यांची अकाली एक्झिट



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणावर अपघातांचा काळा डोळा पडला आहे. गेल्या काही वर्षांत राज्याच्या तीन महत्त्वाच्या लोकनेत्यांनी अचानक अकाली निधन केले – गोपीनाथ मुंडे, विनायक मेटे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार.

गोपीनाथ मुंडे – २०१४ मध्ये केंद्रीय मंत्रिपदावर कार्यरत असताना बीडला जाण्यासाठी निघाले होते. या प्रवासादरम्यान वाहन अपघातात त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या अकाली निधनाने बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रावर शोककळा पसरली.

विनायक मेटे – मराठा आरक्षणासाठी राज्यभर आक्रमकपणे काम करणाऱ्या मेटे यांचा कार अपघात १४ ऑगस्ट २०२२ रोजी झाला आणि त्यांचा मृत्यू झाला. विनायक मेटे हे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य म्हणूनही कार्यरत होते.

अजित पवार – महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि राज्यातील दीर्घकाळ प्रभावी नेता. मुंबईहून बारामतीकडे जात असलेल्या चार्टर्ड बिझनेस जेट विमानाचा अपघात झाला. लँडिंग दरम्यान विमान धावपट्टीवरून बाहेर पडले आणि स्फोट झाल्यामुळे पवारसह सर्व प्रवाशांचा मृत्यू झाला. या तीन घटकांनी महाराष्ट्रातील राजकारण आणि समाजावर खोल परिणाम केला.


### ज्येष्ठ नेते शरद पवारांवर मोठी जबाबदारी

# पवार कुटुंबाचे नेतृत्व येता येता राहिले...

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** बुधवारी सकाळी बारामतीत घडलेल्या विमान दुर्घटनेने एक अपघात घडवला नाही, तर महाराष्ट्राच्या राजकारणातील एक दीर्घकाळ रुजलेली साखळी अचानक तुटली. राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांचे आणि पवार कुटुंबाचे नेतृत्व अधिकृतपणे अजित पवारांकडे सोपवण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात होती, त्याच दिवशी त्यांच्या आयुष्याचा प्रवास थांबला.

८५ वर्षांचे शरद पवार सक्रिय राजकारणातून हळूहळू बाजूला होत, सूत्रे आपल्या पुतण्याकडे सोपवण्याच्या



मनःस्थितीत होते. गेली काही महिने काका-पुतण्या यांच्यातील संवाद, बैठका आणि सत्तांतराची तयारी सुरू होती. राजकारणात दुर्मीळ असलेले सुसूत्र नेतृत्व हस्तांतरण घडणार, अशी चिन्हे स्पष्ट दिसत होती. मात्र, इतिहासाला वेगळाच वळण घ्यायचे होते.

अजित पवार हे कामाच्या बाबतीत काटेकोर, वेळेचे पक्के आणि निर्णयक्षम नेते म्हणून ओळखले जात. सकाळी लवकर काम सुरू करणे, भेटीगाठी टाळू न देणे आणि विकासाच्या प्रश्नांत तडजोड न करणे, हा त्यांचा स्वभाव होता. राज्याच्या राजकारणात वावर असला तरी त्यांची भावनिक नाळ कायम बारामतीशी जोडलेली राहिली. सलग आठ वेळा निवडून आलेला हा मतदारसंघ त्यांच्या राजकीय अस्तित्वाचा कणा होता. कार्यकर्त्यांशी असलेले त्यांचे नाते केवळ राजकीय नव्हते; ते आपुलकीचे आणि संरक्षक होते.

मंगळवारी मंत्रिमंडळ बैठक आटोपून ते बुधवारी सकाळी जिल्हा परिषद निवडणूक प्रचारासाठी बारामतीकडे निघाले. कमी दृश्यमानतेमुळे विमान लँडिंगवेळी अडचणीत सापडले आणि क्षणार्धात सगळे संपले. ज्याठिकाणी त्यांनी आयुष्य घडवले, त्याच परिसरात त्यांचा अंत झाला, हीच या दुर्घटनेची सर्वात बोचरी किनार आहे. 'दादा' म्हणून ओळखले जाणारे अजित पवार तळागाळातील कार्यकर्त्यांना वर आणणारे नेते होते. त्यांच्या शब्दाला पक्षात आणि प्रशासनात वजन होते. कायदे, नियम, प्रक्रिया यांची सखोल जाण आणि त्याचा विकासासाठी वापर करण्याची क्षमता ही त्यांची मोठी ताकद होती. त्यामुळेच ते फक्त राजकीय नेते न राहता, एक प्रभावी प्रशासक ठरले.

शरद पवारांच्या सावलीत वाढले असले तरी अजित पवारांनी स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली. काकांनी राष्ट्रीय पातळीवर लक्ष केंद्रित केले, तर राज्यकारभाराची जबाबदारी त्यांनी समर्थपणे पेलली. मतभेद झाले, वाद झाले; पण मर्यादा कधी ओलांडल्या गेल्या नाहीत. नंतर भाजपसोबत सत्ता वाटप केले, तरी शाहू-फुले-आंबेडकरांच्या विचारांशी असलेली त्यांची बांधिलकी त्यांनी सतत अधोरेखित केली. वाद त्यांना चुकले नाहीत. सिंचन प्रकल्प, आर्थिक प्रकरणे यावर आरोप झाले; काही तपास बंदही झाले. तरीही विकासकेंद्री नेतृत्वावरचा जनतेचा विश्वास टिकून राहिला. स्पष्टवक्तेपणा, 'हो' किंवा 'नाही' ठामपणे सांगण्याची वृत्ती अनेकांना खटकली; पण कालांतराने तीच त्यांची ओळख बनली.

अजित पवार यांच्या अकाली जाण्याने राष्ट्रवादी काँग्रेसच्या दोन्ही गटांपुढे आणि पवार कुटुंबापुढे मोठे प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. नेतृत्वाची पोकळी सहज भरून निघणारी नाही. शांत निवृत्तीचा विचार करणारे शरद पवार पुन्हा एकदा जबाबदारीच्या केंद्रस्थानी उभे ठाकले आहेत. हा केवळ एका नेत्याचा अंत नाही, तर महाराष्ट्राच्या राजकारणातील एका महत्त्वाच्या अध्यायाचा अचानक पडलेला पडदा आहे.

## सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी व्हावी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोलकाता :** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या विमान अपघातात झालेल्या मृत्यूची सर्वोच्च न्यायालयाच्या देखरेखीखाली चौकशी करण्यात यावी, अशी मागणी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी बुधवारी केली. कोणत्याही केंद्रीय किंवा राज्य तपास यंत्रणेवर आपला विश्वास नसल्याचे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.

"आम्हाला फक्त सर्वोच्च न्यायालयावर विश्वास आहे. इतर सर्व तपास यंत्रणा धोक्यात आल्या आहेत. ही घटना अत्यंत दुर्दैवी आणि गंभीर आहे. अजित पवार यांच्या कुटुंबीयांप्रती, महाराष्ट्रातील जनतेप्रती आणि शरद पवार यांच्याप्रती मी मनापासून संवेदना व्यक्त करते," असे बॅनर्जी यांनी म्हटले. या दुर्घटनेनंतर देशातील राजकीय नेत्यांच्या सुरक्षेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याचे त्यांनी नमूद केले. "या देशात राजकीय नेतेही सुरक्षित नाहीत, तर सामान्य नागरिकांचे काय?" असा सवाल करत त्यांनी अपघातामागील सर्व बाबी निष्पक्षपणे तपासल्या जाण्याची गरज व्यक्त केली.

दरम्यान, बॅनर्जी यांनी आणखी एक गंभीर दावा केला. "मला माहिती मिळाली आहे की दुसऱ्या पक्षातील 'कोणीतरी' असे विधान केले होते की, 'पवार भाजप सोडण्यास तयार आहेत.' अशा पार्श्वभूमीवर ही घटना अधिक संशयास्पद वाटते," असे त्या म्हणाल्या. मात्र, या दाव्याबाबत त्यांनी कोणाचेही नाव घेतले नाही.

## संपादकीय

# अकाली थांबलेला कर्मयोग

**अजित पवार यांच्या आकस्मिक निधनाची बातमी महाराष्ट्राला हादरवणारी ठरली आहे. झोकून देऊन काम करणारे, निर्णयक्षम आणि स्पष्टवक्ते नेतृत्व अशा अचानक काळाच्या पडद्याआड गेले. त्यांच्या जाण्याने एक नेता नव्हे, तर एक कार्यशैलीच हरपली आहे.**

महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात काही व्यक्ती पदांमुळे नव्हे, तर त्यांच्या कार्यशैलीमुळे ठसा उमटवतात. अजित पवार हे त्याच मोजक्या नेत्यांपैकी एक होते. त्यांच्या आकस्मिक निधनाची बातमी म्हणजे केवळ राज्याच्या उपमुख्यमंत्र्याच्या मृत्यूची नोंद नाही; ती गेल्या तीन दशकांत महाराष्ट्राच्या राजकारणाला आकार देणाऱ्या एका ठाम, निर्णयक्षम आणि वादग्रस्त पण प्रभावी नेतृत्वाच्या अस्ताची जाणीव करून देणारी घटना आहे. त्यामुळेच ही बातमी राज्याला हादरवणारी ठरली आहे. अजित पवारांचे राजकारण भावनिक आवाहनांवर कमी आणि व्यवहार्यतेवर अधिक आधारलेले होते. त्यांनी स्वतःला कधीही लोकाभिमुख प्रतिमांच्या चौकटीत बंदिस्त केले नाही. निर्णय घ्यायचा तर तो स्पष्ट असावा, आणि घेतलेल्या निर्णयाची जबाबदारी स्वीकारायची तयारी असावी ही त्यांची भूमिका होती. त्यामुळेच त्यांच्या अनेक निर्णयांवर टीका झाली, वाद निर्माण झाले; पण त्या टीकेला सामोरे जाताना त्यांनी कधीही आपली भूमिका लपवली नाही. राजकारणात ही स्पष्टता दुर्मीळ ठरते. प्रशासनावर असलेली त्यांची पकड, अचूक आकडेवारीची माहिती आणि आर्थिक शिस्त यामुळे अजित पवार वेगळे ठरले. अर्थसंकल्पीय चर्चांमध्ये त्यांची तयारी, फाईल्सवरील प्रभुत्व आणि वेळेच्या चौकटीत काम पूर्ण करण्याचा आग्रह यामुळे अधिकारीवर्गात त्यांच्याबद्दल आदर आणि धाक अशा दोन्ही भावना होत्या. पहाटेपासून कामाला लागणारा मंत्री, सकाळी सहा वाजताही बैठकांना हजर राहणारा नेता, ही त्यांची ओळख होती. कामाच्या बाबतीत ‘नंतर पाहू’ किंवा ‘विचार करू’ अशा शब्दांना त्यांच्या शब्दकोशात फारसा वाव नव्हता. त्यांचे व्यक्तिमत्त्व मात्र एकसुरी नव्हते. रोखठोक भाषा, कधी कधी कठोर वाटणारी शैली आणि तितकीच ठाम निर्णयप्रक्रिया यामुळे ते अनेकांना अप्रिय वाटले. पण त्याच वेळी चूक ती चूक आणि बरोबर ते बरोबर असे स्पष्टपणे सांगण्याचे धैर्य त्यांच्याकडे होते. लोकप्रियतेपेक्षा कार्यक्षमतेला प्राधान्य देणारी ही वृत्ती आजच्या राजकारणात अपवादात्मक ठरते. लोकनेतेपणाच्या पारंपरिक चौकटी त्यांनी अनेकदा मोडल्या, पण विकास, पायाभूत सुविधा आणि आर्थिक नियोजन या बाबतीत त्यांनी सातत्य राखले. त्यांचा राजकीय प्रवास व्यापक आणि गुंतागुंतीचा होता. १९९१ मध्ये बारामतीतून लोकसभेवर निवडून येत त्यांनी संसदीय राजकारणात पाऊल ठेवले. मात्र राजीव गांधींच्या हत्येनंतर घडलेल्या घडामोडींनी राष्ट्रीय राजकारणाला वेगळे वळण दिले. शरद पवार दिल्लीच्या राजकारणात गेले, महाराष्ट्रात नेतृत्वबदल झाला आणि त्या टप्प्यावर अजित पवारांनी खासदारकीचा राजीनामा देत काकांसाठी जागा मोकळी केली. तेव्हाच त्यांनी महाराष्ट्रालाच आपले मुख्य कार्यक्षेत्र मानण्याचा निर्णय घेतला. पुढील तीन दशकांत त्यांनी विधानसभेच्या राजकारणात स्वतःचा ठसा उमटवला. राज्याच्या राजकारणातील बदलत्या समीकरणांत अजित पवार हे कायम निर्णायक घटक राहिले. पक्षांतर्गत संघर्ष, सत्तांतरांची उलथापालथ आणि वैचारिक मतभेद यांतून त्यांनी स्वतःची स्वतंत्र ओळख टिकवली. त्यांच्या भूमिकांवर प्रश्न उपस्थित झाले, आरोप झाले; मात्र त्यांनी कधीही जबाबदारीपासून पळ काढल्याचे दिसले नाही. राजकारणात टिकून राहण्यासाठी केवळ वक्तृत्व नव्हे, तर व्यवस्थेची खोल जाण आणि योग्य वेळी कठोर निर्णय घेण्याची क्षमता लागते, ती क्षमता त्यांच्या नेतृत्वात स्पष्टपणे दिसत होती. अजित पवारांचे निधन म्हणजे एका व्यक्तीची हानी नव्हे, तर एका कार्यशैलीचा अंत आहे. आजच्या राजकारणात जिथे प्रतिमानिर्मिती, भावनिक घोषणाबाजी आणि तात्कालिक लोकप्रियतेवर भर वाढताना दिसतो, तिथे त्यांच्या कामकाजातील काटेकोरपणा आणि परिणामकारकता अधिक ठळकपणे जाणवते. सार्वजनिक धोरणे आकड्यांच्या आधारावर मांडणे, आर्थिक वास्तव स्वीकारून निर्णय घेणे आणि त्यासाठी अप्रिय ठरण्याची तयारी ठेवणे ही त्यांची शैली सहजपणे दुसऱ्याला अंगीकारता येणारी नाही. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी तात्काळ भरून निघेल, अशी अपेक्षा करणे वास्तववादी ठरणार नाही. नेतृत्व तयार होण्यासाठी वेळ, अनुभव, संघर्ष आणि अपयशांची शिदोरी लागते. अजित पवारांनी ती शिदोरी स्वतःच्या कारकिर्दीत कमावली होती. त्यामुळेच त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्राच्या राजकारणाला आत्मपरीक्षणाची गरज आहे. आपण कार्यक्षमतेला किती महत्त्व देतो, निर्णयक्षमतेला किती प्राधान्य देतो आणि सार्वजनिक हितासाठी कठोर भूमिका घेणाऱ्या नेतृत्वाला कितपत स्वीकारतो, याचा विचार करण्याची ही वेळ आहे. शोक व्यक्त करणे अपरिहार्य आहे; मात्र त्यापुरते न थांबता त्यांच्या कार्यशैलीतून धडे घेणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल. स्पष्टता, जबाबदारी आणि परिणामकारकता ही मूल्ये सार्वजनिक जीवनात जपली गेली, तर अजित पवारांचे राजकीय वारसत्व केवळ आठवणींत मर्यादित राहणार नाही. महाराष्ट्राने एक ठाम नेता गमावला आहे; त्या नेतृत्वातून निर्माण झालेली दिशा पुढे नेण्याची जबाबदारी आता राजकीय व्यवस्थेवर आहे.

# भारत-युरोप करार: मुक्त व्यापाराला नव्याने चालना

**» भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील प्रस्तावित मुक्त व्यापार करार हा केवळ आर्थिक व्यवहार नाही, तर जागतिक व्यापारातील बदलत्या प्रवाहाचा स्पष्ट संकेत आहे. संरक्षणवादी धोरणांपासून दूर जाऊन खुल्या बाजाराकडे वळण्याचा भारताचा हा निर्णायक टप्पा ठरतो.**



जागतिक अर्थव्यवस्थेच्या सध्या अस्थिर आणि अनिश्चित वातावरणात, भारत आणि युरोपियन युनियन यांच्यातील मुक्त व्यापार कराराचा मसुदा समोर येणे हे एक महत्त्वाचे आर्थिक आणि धोरणात्मक क्षण आहे. हा करार केवळ दोन भागीदारांच्या व्यापाराच्या संधींमध्ये वाढ करण्यापुरता मर्यादित नाही; तो जागतिक व्यापाराच्या दिशेकडे मोठ्या संकेताचा पुरावा आहे. सध्याच्या काळात अनेक देश संरक्षणवादी उपाययोजनांकडे वळत असताना भारताने आणि युरोपियन अर्थव्यवस्थेने मुक्त व्यापाराच्या दिशेने पाऊल उचलणे हे आशेचे द्योतक आहे. भारतातील आणि युरोपच्या बाजारपेठेतील व्यापार ऐतिहासिकदृष्ट्या मोठ्या प्रमाणावर समृद्ध राहिला आहे, परंतु संरक्षणवाद, शूल आणि अडथळ्यांमुळे संधींचा पुरेपूर उपयोग होत नाहीये, हा उल्लेखनीय वास्तव आहे. आता प्रस्तावित करारामुळे या अडथळ्यांवर मोठ्या प्रमाणावर तोडगा काढण्याचा प्रयत्न होणार आहे. टॅरिफ कमी करणे, प्रमाणन आणि नियम सुलभ करणे, तसेच सेवा व उत्पादनांच्या बाजारात प्रवेश सुलभ करणे यामुळे व्यापारी व निर्यातदार वर्गाला नव्या क्षेत्रात पाय रोवण्याची संधी मिळेल. भारतीय आर्थिक धोरणाच्या इतिहासावर नजर टाकली तर संरक्षणवादी उपाययोजनांवर भर देण्यात आला होता, ज्यामुळे स्थानिक उत्पादनांचे रक्षण होईल अशी अपेक्षा ठेवण्यात आली होती. मात्र युरोपियन युनियनसोबतचा करार स्पष्ट दाखवतो की भारताने आता संरक्षणवादापेक्षा खुल्या बाजाराचा स्वीकार करण्याची दिशा अधिक दृढ केली आहे. हा बदल फक्त व्यापारात वाढ करूनच अर्थव्यवस्थेला सक्षम करणार नाही, तर दीर्घकालीन विकासाच्या दिशेने भारताला जागतिक स्तरावर अधिक प्रभावी भागीदार म्हणून उभे करेल. परस्पर व्यापारातील टॅरिफ कमी केल्याने भारतातील विविध उद्योगांना मोठी संधी मिळणार आहे. वस्त्रोद्योग, समुद्री उत्पादनं, रसायने, औषधी निर्मिती आणि सेवा क्षेत्र यांसारख्या उत्पादनांचा युरोपियन बाजारात अभूतपूर्व प्रवेश खुला होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर युरोपियन वस्तूंना भारतीय बाजारात प्रवेश सुलभ झाल्याने ग्राहकांना निवडीचा फायदा मिळेल आणि उत्पादनांची गुणवत्ता सुधारणे हा दृष्टीकोन उद्भवेल. हा दोन्ही बाजूने समृद्धीचा मार्ग ठरू शकतो, पण त्यासाठी आवश्यक आहे की स्थानिक उद्योग आणि सरकार योग्य समन्वयाने काम करतील. या कराराच्या अंमलबजावणीमध्ये आणखी काही बाबी लक्षात घेण्यासारख्या आहेत. प्रमाणपत्रे, तांत्रिक नियम, बौद्धिक संपदा हक्क आणि सेवा क्षेत्रातील अडथळ्यांबाबत स्पष्ट नियमावलीचा समावेश करणे हा कराराचा भाग आहे. त्यामुळे भारतीय सेवाक्षेत्राला, सॉफ्टवेअर, तंत्रज्ञान सेवा आणि व्यावसायिक सेवा यांना युरोपियन ग्राहकांसमोर पोहोचण्याची संधी अधिक व्यापक होईल. ही संधी केवळ आर्थिक वाढ वाढविणारी नाही, तर कौशल्य, नवोपक्रम आणि स्पर्धात्मकता यांना बळ देणारी ठरेल. तथापि, या कराराच्या अंमलबजावणीनंतर काही चिंताही समोर येऊ शकतात. भारताच्या काही उद्योगांनी, विशेषतः लघु व मध्यम उद्योगांनी, युरोपियन वस्तूंच्या जास्त प्रवेशामुळे स्पर्धात्मक दबाव अनुभवला तर त्यावर उपाययोजना करणे आवश्यक आहे. स्थानिक कामगार, उत्पादन खर्च आणि कौशल्य विकास यांचा समन्वय साधल्याशिवाय काही क्षेत्रात तणाव जाणवू शकतो. त्यामुळे सरकारने संरक्षण आणि प्रोत्साहन यांच्यात संतुलन राखत योग्य धोरण आखणे गरजेचे आहे. या कराराचे महत्त्व त्या व्यापक संदर्भातही पाहायला हवे, जिथे जागतिक व्यापार आणि गुंतवणूक धोरणे दीर्घकाळ संरक्षणवादाच्या प्रभावाखाली होती. जागतिक पुरवठा साखळींच्या बदलत्या स्वरूपात आणि व्यापारातील वाढत्या स्पर्धेत, भारत आणि युरोपमधील मुक्त व्यापार करार हे संरक्षणवादाच्या पराभवाची जाणीव करून देणारे आहे. हे दर्शवते की मुक्त व्यापाराच्या विपरीत प्रवाहातही, अर्थव्यवस्था आणि व्यापार धोरणांनी सहकार्य व संवादाकडे प्राधान्य दिले पाहिजे. निश्चितच हा करार संपूर्णपणे लागू होण्यासाठी आणखी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करावी लागेल आणि त्यात काही फेरबदल देखील संभव आहेत. पण त्याचा हेतू स्पष्ट आहे: व्यापाराच्या दृष्टीने अधिक खुली, विविध आणि समृद्ध अर्थव्यवस्था निर्माण करणे. निर्यातदार, उपभोक्ता, गुंतवणूकदार आणि उद्योग या सर्वांसाठी या करारात संधी आणि आव्हाने दोन्ही आहेत. जो मार्ग हा देशाच्या दीर्घकालीन विकास व जागतिक सहभागाला वळण देतो, तो मार्ग भारताने स्वीकारल्याचा हा करार पुरावा आहे. या कराराचे महत्त्व फक्त आजच्या व्यापार व्यवस्थेत नाही, तर भविष्यातील जागतिक आर्थिक नकाशात भारताची भूमिका अधिक निर्णायक व विश्वासार्ह बनविण्यात आहे. संरक्षणवाद मागे सरकत आहे, आणि मुक्त व्यापाराच्या भूमिका समोर येत आहे, हेच या कराराचे वैशिष्ट्य आहे. जागतिक अर्थव्यवस्थेतील बदलत्या घडामोडींमध्ये भारताचे स्थान सुदृढ करणे, आणि भारतीय उद्योगांना अधिक संधी देणे या दृष्टीने हा करार एक मोठा पाऊल ठरणार आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये शिवजयंती व प्रबोधन पर्वाच्या नियोजनासाठी समन्वय बैठक

## २९ जानेवारी रोजी महापालिकेत बैठक; उत्सव मंडळे, संस्था, पोलीस व प्रशासनाचा सहभाग

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरात दरवर्षी १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात आणि व्यापक सहभागातून साजरी करण्यात येते. शहरातील विविध शिवजयंती उत्सव मंडळे, शैक्षणिक संस्था, सामाजिक संघटना, ट्रस्ट, कामगार संघटना तसेच नागरिक मोठ्या संख्येने या उत्सवात सहभागी होतात. यासोबतच पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध भागांत शिवाजी महाराज विचार प्रबोधन पर्वाचे आयोजन करण्यात येते.

यावर्षी १९ फेब्रुवारी २०२६ रोजी साजऱ्या होणाऱ्या शिवजयंती व प्रबोधन पर्वाचे नियोजन सुयोग्य आणि शिस्तबद्ध पद्धतीने करण्यासाठी सर्व संबंधित घटकांमध्ये विचारविनिमय होणे आवश्यक आहे. या अनुषंगाने शहरातील शिवजयंती उत्सव मंडळांचे अध्यक्ष, विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, पोलीस प्रशासनाचे अधिकारी तसेच महानगरपालिकेचे अधिकारी यांची संयुक्त समन्वय बैठक आयोजित करण्यात आली आहे.

ही बैठक गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६ रोजी दुपारी ४ वाजता पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृह येथे होणार असून, या बैठकीचे अध्यक्षस्थान अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे भूषवणार आहेत. बैठकीत शिवजयंती उत्सवाचे नियोजन, मिरवणुकीची रूपरेषा, कार्यक्रमांचे वेळापत्रक, वाहतूक व सुरक्षा व्यवस्था, स्वच्छता, परवानग्या तसेच प्रबोधन पर्वाच्या आयोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे. शिवजयंती उत्सव शांततेत, शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी वातावरणात पार पाडण्यासाठी सर्व संबंधितांचे समन्वयाने काम करणे आवश्यक असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

# हिंजवडी आयटी पार्क, एमआयडीसी परिसरावर ‘सीसीटीव्ही’द्वारे निगराणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** गुन्हे नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन, गर्दी नियंत्रण आणि सार्वजनिक सुरक्षेला अधिक बळ देण्यासाठी पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयासाठी कृत्रिम बुद्धीमत्ता (एआय) आधारित एकात्मिक सीसीटीव्ही प्रकल्पास राज्य शासनाच्या उच्चस्तरीय समितीची (एचपीसी) मान्यता मिळाली आहे. गृह विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाला हिरवा कंदील दाखवला असून, यामुळे औद्योगिक व आयटी क्षेत्रातील सुरक्षिततेत मोठी वाढ होणार आहे.

या प्रकल्पाअंतर्गत चाकण, तळेगाव दाभाडे, भोसरी एमआयडीसी तसेच हिंजवडी आयटी पार्क परिसरात अत्याधुनिक सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. हे कॅमेरे एआय तंत्रज्ञानाने सुसज्ज असणार असून, संशयास्पद हालचाली ओळखणे, वाहतूक कोंडीचे त्वरित व्यवस्थापन करणे, अपघातप्रवण ठिकाणांवर लक्ष ठेवणे तसेच गर्दीच्या ठिकाणी सुरक्षेची पातळी वाढवणे शक्य होणार आहे.

विशेषतः हिंजवडी आयटी पार्कमध्ये हजारो आयटी कर्मचारी, वाहने आणि नागरिकांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. त्यामुळे या परिसरात गुन्हेगारी रोखणे, महिला व नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देणे आणि वाहतूक सुरळीत ठेवणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. नव्या सीसीटीव्ही प्रकल्पामुळे नियंत्रण कक्षातून रिअल टाइम निरीक्षण शक्य होणार आहे.

# वाघोलीत आईकडून ११ वर्षीय मुलाचा खून; १३ वर्षीय मुलीवर चाकूने हल्ला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** वाघोली परिसरात आईने आपल्या ११ वर्षांच्या मुलाचा चाकूने गळा चिरून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. याच घटनेत आईने १३ वर्षीय मुलीवरही चाकूने वार केल्याने मुलगी गंभीर जखमी झाली असून तिच्यावर सध्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात खळबळ उडाली आहे.

साईराज संतोष जायभाय (वय ११) असे खून झालेल्या मुलाचे नाव असून, धनश्री संतोष जायभाय (वय १३) असे जखमी मुलीचे नाव आहे. या प्रकरणी आई सोनी संतोष जायभाय हिला पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, सोनी जायभाय हिने धारदार चाकूने प्रथम मुलगा साईराज याचा गळा चिरून खून केला, त्यानंतर मुलगी धनश्री हिच्यावरही चाकूने वार केले.

सोनी जायभाय मूळची नांदेड जिल्ह्यातील कंधार तालुक्यातील रहिवासी असून, जायभाय कुटुंबीय सध्या वाघोलीतील बायफ रस्त्यावरील परिसरात वास्तव्यास आहेत. या भीषण घटनेमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मानसिक तणाव, कौटुंबिक वाद किंवा अन्य कारणांचा तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. घटनेची माहिती मिळताच वाघोली पोलीस ठाण्याच्या पथकाने तातडीने घटनास्थळी धाव घेतली. गंभीर जखमी अवस्थेत असलेल्या साईराज व धनश्री या दोघांना त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले.

# पुणे महापालिकेच्या महापौर निवडीत ओबीसी आरक्षण नियमभंगाचा आरोप; उच्च न्यायालयात याचिका दाखल

## महापौरपदासाठी आरक्षण योग्य रितीने न ठेवल्याचा पुरावा मागितला; ३० जानेवारीला सुनावणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** पुणे महापालिकेच्या महापौर निवडीचा विषय बॉम्बे उच्च न्यायालयात पोहोचला आहे, ज्यात महापौरपदासाठी आरक्षणासंबंधी नियमांचे उल्लंघन झाल्याचा गंभीर दावा करण्यात आला आहे. या प्रकरणावर ३० जानेवारी २०२६ रोजी सुनावणी होणार आहे, अशी माहिती सार्वजनिक झाली आहे.

याचिकेत म्हटले आहे की, कायद्यातील तरतुदीनुसार महापौरपदासाठी चक्रानुक्रमे आरक्षण ठेवण्याची आवश्यकता असते, परंतु शासनाच्या नगर विकास विभागाने काढलेल्या अधिसूचनेत हा प्रकार पाळण्यात आला नाही. सदर अधिसूचना नियमांचे उल्लंघन असून त्यामुळे इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) व अनुसूचित जाती प्रवर्गातील नगरसेवकांना संधी हुकली असा आरोप याचिकाकर्त्याने केला आहे. यामुळे काही प्रवर्गांना न्यायालयीन तरतुदीनुसार प्रतिनिधित्व मिळावे, अशी मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

याचिका वरिष्ठ वकील अनिल अंतुरकर आणि वकील प्रथमेश बरगुडे यांच्या नेतृत्वाखाली न्यायमूर्ती रवींद्र घुगे आणि न्यायमूर्ती अभय मंत्री यांच्या खंडपीठासमोर सादर करण्यात आली. न्यायालयाने याचिकाकर्त्याला “मतदारासाठी हा निर्णय का केले गेले?” असा प्रश्न विचारला असून, कायद्यानुसार प्रत्येक प्रवर्गाचे प्रतिनिधित्व सुनिश्चित केले जाणे आवश्यक असल्याची भूमिका मंदिराने अधोरेखित केली. सुनावणी पुढील ३० जानेवारी रोजी होईल, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. पुणे महानगरपालिकेच्या महापौरपदासाठी २०२६ ते ऑक्टोबर २०२९ या काळात केवळ विशिष्ट प्रवर्गांसाठी आरक्षण ठेवायचे किंवा लक्षात घ्यायचे याबाबत सुद्धा याचिकेत मागणी करण्यात आली आहे. याचिकाकर्त्यांनी संबंधित अधिसूचना रद्द करून नियमांनुसार योग्य आरक्षण पुनर्स्थापित करण्याचीही विनंती केली आहे. सध्या महापौर निवडीचे नियोजन आरक्षणाच्या नवीन नियमांनुसार झाले असून, महापौरपदासाठी “खुला (महिला)” प्रवर्ग राखीव केले गेले आहे.

# उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पीसीएमसीच्या वतीने आदरांजली

## मुख्य प्रशासकीय भवनामधील प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पिंपरी :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांचे आज सकाळी विमान दुर्घटनेत अपघाती निधन झाले. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनामधील त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

याप्रसंगी अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, शहर अभियंता मकरंद निकम, नगररचना उपसंचालक किशोर गोखले, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रविण जैन, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, प्रमोद ओंभासे, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, चेतना केरूरे, संदीप खोत, राजेश आगळे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिका कर्मचारी उपस्थित होते. यावेळी अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मौन पाळून उपमुख्यमंत्री अजित पवार यांना आदरांजली वाहिली.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवस दुखवटा जाहीर करण्यात आला असून आज प्रशासकीय सुट्टी जाहीर करण्यात आली आहे.

# पुणे महापालिकेत दुचाकी वाहनांना प्रवेशावर बंदी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** वाहनसंख्येतील वाढ लक्षात घेऊन पुणे महानगरपालिकेने महापालिका मुख्य प्रशासकीय भवनाच्या आवारात दुचाकी वाहनांना प्रवेश न देण्याचा प्रयोग राबविला आहे, ज्यामुळे नागरिकांना मोठा पार्किंग त्रास सहन करावा लागत आहे. या निर्णयामुळे महापालिकेत कामानिमित्त आलेले दुचाकीस्वार वाहने आत सोडू शकत नाहीत आणि अनेकांनी वाहने मुख्य इमारतीसमोरील रस्त्याच्या कडेला पार्क केली आहेत, परंतु त्या ठिकाणीही वाहतूक पोलिसांकडून कारवाई होत असल्याचे नागरिकांनी तक्रार केली आहे.

महापालिका प्रशासनाने महापुरात येणाऱ्या वाहनांवर आणि पार्किंगच्या व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी हा निर्णय घेतल्याचे सांगितले आहे. महापालिका भवनाच्या नवीन इमारतीतील तळघर आणि जुन्या व नवीन इमारतीच्या मधील मोकळ्या जागेत होणारे दुचाकी पार्किंगही बंद करण्यात आले आहे, त्यामुळे दररोज सुमारे ५०० दुचाकींपैकी सुमारे ३०० दुचाकींचा पार्किंग प्रश्न उभा राहिला आहे.

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी म्हटले की, “महापालिका भवनात येणाऱ्या वाहनांची संख्या वाढत आहे आणि पार्किंग ही गंभीर समस्या आहे. महापालिकेतील कर्मचारी व नागरिकांसाठी बससेवा आणि मेट्रो मार्गाने आवारात येण्याचे प्रोत्साहन देण्यास विचार करत आहोत.” असे सांगितले आहे. यासाठी व्यवस्था सुधारण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26



# 'दादा' माणूस हरपला!

## अपघात नेमका कसा झाला?

- **सकाळी ८.१० वाजता** मुंबईहून लियरजेट 45 XR या खासगी विमानाने उपमुख्यमंत्री अजित पवार बारामतीकडे रवाना झाले. या विमानात एकूण पाच जण होते.
- **सकाळी ८.४० वाजता** विमान बारामती एअरस्ट्रीपच्या जवळ पोहोचले असताना त्यामध्ये तांत्रिक बिघाड झाल्याचे निदर्शनास आले.
- **सकाळी ८.४६ वाजता** तांत्रिक बिघाडामुळे वैमानिकाचे विमानावरील नियंत्रण सुटले.
- बारामतीतील गोजुबावी परिसरातील शेतात विमान कोसळले.
- या भीषण अपघातात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह विमानातील सर्वांचा मृत्यू झाला.

## अपघाताचा सविस्तर घटनाक्रम

- पुणे-बारामती परिसरात सकाळच्या वेळी दाट धुके होते.
- दृश्यमानता अत्यंत कमी असल्यामुळे लँडिंग कठीण झाले.
- बारामती विमानतळ लहान असून तेथे ILS (Instrument Landing System) सुविधा उपलब्ध नाही.
- त्यामुळे वैमानिकाला मॅन्युअल लँडिंग करणे भाग पडले.
- विमानाने रनवेवर थेट उतरण्याऐवजी मोठा वळसा घेतला.
- यावरून पहिला लँडिंग प्रयत्न रद्द
- करण्यात आल्याचे स्पष्ट होते. धुक्यामुळे रनवेवर योग्यरीत्या समांतर होणे अवघड झाले.
- दुसरा लँडिंग प्रयत्न सुरू असतानाच वैमानिकाने MAYDAY कॉल जारी केला.
- DGCA च्या सूत्रांनुसार हा टेबल-टॉप रनवे असल्याने धोका अधिक होता.
- लँडिंगदरम्यान सुमारे १०० फूट उंचीवर विमानाचा तोल गेला.
- रनवेपर्यंत पोहोचण्याआधीच विमान जमिनीवर आदळले.
- जमिनीवर आदळताच मोठा स्फोट झाला, त्यानंतर अनेक लहान स्फोट झाले.

# अजित पवार : महाराष्ट्राच्या राजकारणातील दादा नेता

अजित अनंतराव पवार हे महाराष्ट्रातील राजकारणातील एक दीर्घकाळ प्रभावी, प्रशासकीय दृष्ट्या सक्षम आणि रणनीतीप्रधान नेते होते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेते म्हणून त्यांनी राज्याच्या कृषी, जलसंपत्ती, औद्योगिक धोरणे आणि प्रशासकीय निर्णयांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले. बारामतीमधील त्यांचे जनाधार आणि कार्यक्षम नेतृत्व हे महाराष्ट्राच्या राजकारणातील त्यांच्या स्थानाचे प्रमुख कारण ठरले.

अजित पवारांचा जन्म २२ जुलै १९५९ रोजी पुण्याजवळील पन्हाळा येथे झाला. ते माजी केंद्रीय आणि महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध नेते शरद पवार यांचे चुलते भाऊ आहेत. राजकारणाशी त्यांचा संबंध वडिलांच्या प्रेरणेनेच सुरुवातीपासून मजबूत झाला. १९८२ मध्ये स्थानिक सहकारी संस्था निवडणुकीत विजय मिळवत त्यांनी आपल्या राजकीय प्रवासाला प्रारंभ केला. सुरुवातीपासूनच त्यांनी जनसंपर्क, प्रशासन आणि ग्रामीण विकास या क्षेत्रात अनुभव मिळवला.


१९८५ मध्ये विधानसभेत पहिल्यांदाच निवडून आल्यानंतर त्यांनी राज्याच्या विकासकामात सक्रिय सहभाग घेतला. महाराष्ट्रातील कृषी, सिंचन, ऊर्जा, औद्योगिक विकास आणि वित्तीय नियोजन या विभागांवर त्यांचा प्रभाव दिसून आला. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी आणि सामान्य जनतेसाठी त्यांनी अनेक योजना राबवल्या. त्यांच्या नेतृत्वाखाली सिंचन प्रकल्प गतीने पूर्ण झाले, औद्योगिक धोरणांत सुधारणा केली गेली आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळाली.

१९९१ मध्ये त्यांनी बारामती लोकसभा मतदारसंघातून लोकसभेत प्रवेश केला. त्यानंतरच्या अनेक वर्षांत ते महाराष्ट्राच्या प्रशासनात विविध महत्त्वाच्या पदांवर कार्यरत राहिले. १९९२-१९९५ या काळात जलसंपत्ती आणि ऊर्जा विभागावर त्यांनी लक्ष केंद्रीत केले. १९९९-२००४ या काळात कृषी आणि उद्योग मंत्रालयाची जबाबदारी सांभाळत त्यांनी राज्याच्या आर्थिक आणि औद्योगिक धोरणात महत्त्वपूर्ण वाटा उचलला. २००४-२००९ या काळात वित्तमंत्रिपदावर कार्य करत राज्याच्या अर्थसंकल्प आणि वित्तीय नियोजनावर त्यांचा प्रभाव दिसून आला.

अजित पवार हे उपमुख्यमंत्री पदावर अनेकदा कार्यरत राहिले. २००९-२०१४ या कालावधीत त्यांनी पहिल्यांदाच उपमुख्यमंत्रिपदाची जबाबदारी पार पाडली. २०१६ मध्ये ते पुन्हा उपमुख्यमंत्रिपदावर आले आणि कृषी, जलसंपत्ती आणि औद्योगिक धोरणांवर कार्य केले. २०१९ मध्ये महा विकास आघाडी सरकारात उपमुख्यमंत्री पदावर ते कार्यरत राहिले आणि राज्याच्या प्रशासकीय स्थैर्यात त्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले.

२०23 मध्ये अजित पवार यांचा पक्षांतर्गत महत्त्वाचा बदल झाला. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीमध्ये शरद पवार गटापासून त्यांनी आपला वेगळा गट तयार केला आणि राष्ट्रवादी काँग्रेस म्हणून त्यांची नोंद झाली. निवडणूक आयोगाने अजित पवार यांचा गट ही मूळ राष्ट्रवादी काँग्रेस मानले आणि पक्षाचे नाव व चिन्ह त्यांना देण्यात आले. या निर्णयामुळे महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे बदलली, पण अजित पवार यांनी आपल्या अनुभव आणि नेतृत्वाने पक्ष व प्रशासन दोन्ही स्थिर ठेवले. राजकीय दृष्टीने अजित पवार हे अत्यंत रणनीतीप्रधान आणि प्रशासनिक दृष्ट्या कुशल नेता मानले जातात. ते जनतेशी थेट संवाद साधण्यात विश्वास ठेवत आणि निर्णय प्रक्रियेत पारदर्शकतेला प्राधान्य देत. त्यांना समर्थक आदराने "दादा" असे संबोधत, त्यांच्या सोप्या व विनम्र स्वभावाचे कौतुक करतात. त्यांनी राज्याच्या विकासकामात सतत जनहिताला प्राधान्य दिले आणि कृषी, औद्योगिक धोरणे व जलसंपत्ती व्यवस्थापन यांसारख्या क्षेत्रात नवे मार्ग मोकळे केले.दुर्दैवाने, २८ जानेवारी रोजी बारामतीच्या दिशेने जात असताना त्यांच्या विमानाचा अपघात झाला आणि ते प्राणघातक ठरले. या अपघाताने महाराष्ट्रातील राजकारणावर शोककळा पसरली. राज्याचे नेते, आमदार, जनतेचा मोठा वर्ग या दुःखद घटनेने प्रभावित झाला. अजित पवार हे महाराष्ट्रातील राजकीय इतिहासातील एक दीर्घकाळ सक्रिय, अनुभवी आणि प्रभावी नेता होते. त्यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील कृषी, जलसंपत्ती, औद्योगिक धोरणे आणि प्रशासनिक कामकाजात नवे अध्याय रचले गेले. त्यांच्या कार्याचा आणि धोरणात्मक निर्णयांचा वारसा महाराष्ट्राच्या राजकारणात कायम राहणार आहे.

## प्रशासनावर अचूक पकड असलेला नेता



माझे मित्र आणि राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं निधन झालं. महाराष्ट्राच्या राजकारणाने एक उमदा नेता गमावला.अजित पवार यांचा आणि माझा राजकारणातला प्रवेश हा काहीसा एकाच काळातील, अर्थात आमचा परिचय हा बराच नंतरचा. पण राजकारणावर कमालीचं प्रेम या एका गुणावर अजित पवारांनी महाराष्ट्राच्या राजकारणात खूप मोठी झेप घेतली. अजित पवार हे पवार साहेबांच्या मुशीत जरी तयार झालेले नेते असले, तरी त्यांनी नंतर स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आणि ही ओळख महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात ठसवली. १९९० च्या दशकांत महाराष्ट्रात शहरीकरणाने वेग पकडला. ग्रामीण भाग अर्धशहरीपणाकडे झुकू लागला, तरी तिथल्या राजकारणाचा बाज हा ग्रामीणच होता, जरी तिथल्या प्रश्नांचं स्वरूप हे काहीसं शहरी होत चाललं असलं तरी. या पद्धतीच्या राजकारणाचा पूर्ण अंदाज आणि ते उत्तम पद्धतीने कसं हाताळायचं याचं कसब अजित पवारांकडे होतं. पिंपरी चिंचवड आणि बारामती ही त्याची दोन उत्तम उदाहरणं. पिंपरी चिंचवड असेल की बारामती असेल अजित दादांनी या भागांचा कायापालट केला हे त्यांचे राजकीय विरोधक पण मान्य करतील. प्रशासनावर अचूक पकड आणि एखाद्या फाईलीचा गुंता सोडवताना त्याची गाठ नक्की कुठून सोडवायची याचं अचूक ज्ञान असलेला हा नेता होता. प्रशासन हे सत्ताधाऱ्यांच्या पेक्षा वरचढ होण्याच्या काळात असा नेता महाराष्ट्राने गमावणं हे अतिशय दुर्दैवी आहे. अजित पवार हे कमालीचे स्पष्टवक्ते होते. काम होणार नसेल तर ते तोंडावर सांगायचं आणि होणार असेल तर त्यासाठी ते सगळी शक्ती लावायचे. आश्वासनं देऊन स्वतः भोवती माणसांचा पिंगा घालायचा हा त्यांचा स्वभाव नव्हता. राजकारणात सडेतोडपणाची आणि स्पष्टवक्तेपणाची किंमत मोजावी लागते, त्याचा अनुभव मला पण आहे आणि त्यामुळे ती अजित पवारांना पण किती मोजायला लागली असेल याचा अंदाज करता येतो. अजित पवारांच मला आवडणारं अजून एक वैशिट्य म्हणजे ते अजिबात जातीय नव्हते आणि त्यांच्या राजकरणात जातीपातीला अजिबात स्थान नव्हतं. सध्याच्या राजकारणात जातपात न मानता राजकारण करण्याचं धारिष्ट्य दाखवणारेच नेते कमी उरलेत, त्यात अजित पवार हे अग्रणी होते हे नक्की. राजकारणातला विरोध हा राजकीय असतो, तो व्यक्तिगत नसतो. त्यामुळे एकमेकांवरची जहरी टीका ही व्यक्तिगत घ्यायची नसते, हे भान असलेले नेते महाराष्ट्रात कमी होत चालले आहेत. राजकारणातले दिलदार विरोधक एका मागे एक जाणे हे महाराष्ट्राच्या उमद्या राजकारणाचं मोठं नुकसान आहे. मी आणि माझं कुटुंबीय पवार कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेतर्फे अजित पवारांना भावपुर्ण श्रद्धांजली.

**- मनसे सर्वेसर्वा राज ठाकरे**

## मातीशी नाळ जपणारा 'स्टेट्समन'

अजित पवार हे यशवंतराव चव्हाणांच्या राजकीय तालमीत तयार झालेले नेते होते. सत्ता मिळवायची, टिकवायची—आणि त्यासाठी राजकारणातील कठोर वास्तव स्वीकारायचे; मात्र ही सत्ता लोकांसाठीच आहे, हे कधीही विसरायचे नाही, हा त्यांचा मूलमंत्र होता. म्हणूनच अजित पवार केवळ सत्ताकेंद्रातील नेते नव्हते, तर संसदीय शिस्त समजणारे, प्रशासनाची नस ओळखणारे आणि उभा-आडवा महाराष्ट्र जाणणारे 'स्टेट्समन' होते. प्रशासनातील अधिकारी त्यांना घाबरत; कारण त्यातील प्रत्येक ओळ, प्रत्येक प्रक्रियेची त्यांना सखोल माहिती असे. अजित पवारांनी कधीही जातीचे किंवा धर्माचे राजकारण केले नाही. "लोकांची कामे करा आणि निवडून या," हा त्यांचा साधा, पण प्रभावी खाका होता. अर्ध्या रात्रीही लोकांसाठी उभे राहणारा, अखंड काम करणारा नेता म्हणूनच ते जनतेचे लाडके होते. दादा लोकांत रमायचे—खुमासदार विनोद, थेट बोलणं, कधी खडसावणं, तर कधी पाठीवर हात ठेवणं—हीच त्यांची स्वतंत्र शैली होती.

शरद पवारांसारख्या वटवृक्षाखाली वाढत असताना स्वतंत्र उंची मिळवणं सोपं नव्हतं. काकांच्या बोटाला धरून ते राजकारणात आले, हे खरे; पण त्यानंतर त्यांनी स्वतःची ओळख स्वतःच्या कर्तबगारीने घडवली. अहोरात्र कष्ट, सातत्यपूर्ण अभ्यास, लोकांमध्ये मिसळून स्वतःचे लोक उभे करणे—या प्रक्रियेतूनच ती ओळख आकाराला आली. अजित पवारांचा दरारा होता; दहशत नव्हती. त्यांच्या दादागिरीमागे प्रेमळ माणूस होता. त्यांचे संपूर्ण राजकारण—खरं तर आयुष्यच—भावनांवर चालणारे होते. फारशी व्यूहरचना न रचता, जे मनाला वाटले ते करणे, हा त्यांचा स्वभाव. म्हणूनच कार्यकर्त्यांवर त्यांचा जीव होता. स्टाफमधील सामान्य सहकाऱ्याशीही ते तितक्याच आपुलकीने वागत.

## तळागाळाशी मजबूत नाळ असलेले लोकनेते

श्री अजित पवार जी हे जनतेशी घट्ट नाते असलेले, तळागाळाशी मजबूत नाळ असलेले लोकनेते होते. महाराष्ट्रातील जनतेच्या सेवेत सदैव अग्रभागी राहणारे एक मेहनती व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांना व्यापक आदर होता. प्रशासकीय बाबींची त्यांना सखोल जाण होती. गरीब आणि वंचितांच्या सक्षमीकरणासाठीची त्यांची तळमळ विशेष उल्लेखनीय होती. त्यांचे अकाली निधन अत्यंत धक्कादायक व दुःखद आहे. त्यांच्या कुटुंबीयांप्रती आणि असंख्य चाहत्यांप्रती मनःपूर्वक शोकसंवेदना. ॐ शांती.

**- पंतप्रधान नरेंद्र मोदी**

## संपूर्ण देशाची भरून न निघणारी हानी

"महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार जी यांच्या अपघाती निधनाचे वृत्त अतिशय धक्कादायक, दुर्दैवी आणि दुःखद आहे. त्यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. गेली अनेक वर्षं राज्याच्या विधिमंडळात सोबत काम करताना अजितदादांशी अतिशय जवळचा संबंध राहिला आहे. त्यांचे प्रशासनिक कौशल्य, विकासात्मक दृष्टिकोन आणि लोकांना जोडण्याची हातोटी यांमुळे अजितदादांचे कायमच महाराष्ट्राच्या राजकारणात एक अढळ स्थान राहिले आहे. महाराष्ट्राच्या विकासाची आकांक्षा असलेल्या या लोकनेत्याचे अकाली निधन होणे, ही केवळ महाराष्ट्राचीच नव्हे, तर देशाची कधीही भरून न निघणारी हानी आहे."

**- केंद्रीय मंत्री नितीन गडकरी**

## दिलदार आणि दमदार मित्र गमावला

आज सकाळी घडलेली ही घटना अत्यंत अनाकलनीय आणि धक्कादायक आहे. विमान अपघातात उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे दुःखद निधन झाल्याची वार्ता समजताच महाराष्ट्र हादरून गेला. अजित पवार हे केवळ राजकारणी नव्हते, तर महाराष्ट्राच्या प्रत्येक भागाची जाण असलेले, जनतेच्या प्रश्नांशी थेट नाळ जोडलेले लोकनेते होते. संघर्षातून घडलेले, कोणत्याही परिस्थितीत न डगमगता पुढे जाणारे आणि कठोर निर्णय घेण्याची क्षमता असलेले नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या जाण्याने महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. विकासाच्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका बजावत असतानाच त्यांचे निघून जाणे अविश्वासनीय आणि मनाला चटका लावणारे आहे. अजित पवार हे माझ्यासाठी वैयक्तिक पातळीवर एक दिलदार आणि दमदार मित्र होते, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. त्यांच्या कुटुंबावर कोसळलेला हा आघात अत्यंत मोठा असून सरकार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. अजित पवार यांच्यासारख्या लोकनेत्याच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघणारी नाही. इतक्या जवळून, संघर्षाच्या काळात एकत्र काम केलेल्या सहकाऱ्याचा असा अचानक निरोप स्वीकारणे मनाला कठीण जात आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

## राजकारणातील मोठा भाऊ हरपला



अजित पवारांच्या जाण्याने महाराष्ट्रावर दुःखाचा डोंगर कोसळला असून राज्याचे मोठे नुकसान झाले आहे. कुणीही स्वप्नातही असा प्रसंग येईल, अशी कल्पना केली नव्हती. या विमान दुर्घटनेत आपला सहकारी आणि पाच ते सहा जणांचा जीव गेला आहे. त्यामुळे या अपघाताची चौकशी होणे अत्यावश्यक आहे. भविष्यात असे अपघात टाळण्यासाठी कारणांचा शोध घेणे गरजेचे असून, संबंधित यंत्रणांकडून सखोल तपास केला जाईल.

आज घडलेली घटना मनाला वेदना देणारी आणि चटका लावणारी आहे. अजित पवार एवढ्या लवकर आपल्यातून निघून जातील, यावर विश्वास बसत नाही. अजित पवार गेल्या अनेक वर्षांपासून महाराष्ट्राच्या राजकारणाचे नेतृत्व करत होते. त्यांचा परखड, स्पष्टवक्तेपणा आणि प्रशासनावर असलेली मजबूत पकड सर्वश्रुत होती. कोणतीही बाब सखोल अभ्यास केल्यानंतरच मांडण्याची त्यांची सवय होती. चूक ती चूक आणि बरोबर ते बरोबर, असे निर्भीडपणे सांगणारे आणि मनाने निर्मळ असलेले नेतृत्व महाराष्ट्राने गमावले आहे. अजित पवार हे पहाटेपासून कामाला लागणारे नेते होते. मंत्रिमंडळात त्यांनी अनेक वर्षे एकत्र काम केले. मुख्यमंत्री असताना अजित पवारांनी उपमुख्यमंत्री म्हणून जबाबदारी पार पाडली. राज्यातील विविध योजना राबवताना आर्थिक शिस्त आणि काटकसर यावर त्यांनी विशेष भर दिला. एकदा निर्णय घेतला की तो अमलात आणण्याची त्यांची ठाम वृत्ती होती. 'करतो, बघतो' असे शब्द त्यांच्या शब्दकोशात नव्हते. वेळेचे भान ठेवून काम करणारा असा नेता महाराष्ट्राने गमावला आहे. काल-परवाच एका कार्यक्रमात भेट झाली होती. त्यावेळी झालेल्या चर्चा आणि गप्पा आज आठवत आहेत. अजित पवार हे वयाने आणि अनुभवाने माझ्यापेक्षा मोठे होते. राज्याच्या अनेक महत्त्वाच्या विषयांचा त्यांना सखोल अभ्यास होता आणि त्यांच्या कामाचा राज्याला मोठा फायदा झाला. त्यांच्या जाण्याने केवळ पवार कुटुंबाचेच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्राचे न भरून येणारे नुकसान झाले आहे. राजकारणातील एक मोठा भाऊ हरपल्याची भावना मनात असून, मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो

**- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**